I J R S S I S, Spl Issue (III), July-2020 : 53-56
A Double-Blind Peer Reviewed Journal
e-ISSN 2347 – 8268 & 2347-8209 (P)
Original Article
INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES
© VMS RESEARCH FOUNDATION www.ijrssis.in

# कोविड 19: ई- लर्निंगचे अध्ययन - अध्यापनाचे फायदे व तोटे

किरण चिकाटे
मारीया अध्यापक, महाविद्यालय, तुकूम, चंद्रपूर
*Corresponding Author: kiranchikate1976@gmail.com

**सारांश:-**

मनुष्याने शिक्षणाच्या माध्यमातून जी उत्तुंग भरारी मारली आहे, जे स्थान पटकावले आहे ते सातत्याने टिकवावयाचे असेल त्यासाठी शिक्षणाला जीवनातून वगळता येणार नाही. शिक्षणाला जीवनात केंद्रीय स्थान आहे. जगात प्राचिन काळापासून शिक्षण प्रक्रिया चालू आहे परंतु आज कोविड-19 या जीवघेण्या संकटाचे मोठे संकट जगावर ओढवले असल्यामुळे त्याचा जसा आर्थिक, सामाजिक, राजकीय स्तरावर परिणाम झाला, त्याचप्रमाणे शैक्षणिक संस्थावर ही खुप मोठा परिणाम झाला आहे. कोविड -19 मुळे पुर्ण देशात लाॅकडाऊन करण्यात आले, त्यामुळे शैक्षणिक संस्था बंद कराव्या लागल्या आज तीन महिन्यापासून शाळा बंद आहे. सर्व विद्यार्थी पालक यांच्यात भयाचे वातावरण निर्माण झाले आहे. प्रत्येकाला वाटू लागले कि आपण शिक्षणापासून वंचित तर नाही होणार? त्याच प्रमाणे विद्यार्थ्यांना सतत घरात राहून मानसिक त्रासाला सुध्दा समोर जावे लागत आहे. वांचा विचार करुन अध्यन-अध्यापन चालू करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. विद्यार्थ्यींच्या शिक्षणात खंड पडू नये, तसेच शाळा सुरु केल्यास त्यांच्या आरोग्याला धोखा संभावतो तो टाळावा यासाठी प्रचलित अध्यन-अध्यापन न देता विद्यार्थ्यींना ई-लर्निग अध्यन-अध्यापन सुरु करावे असा निर्णय घेतला आहे. यामुळे विद्यार्थी कुठेही असले तरी त्यांचे शिक्षण सुरु राहील. त्यांच्या शिक्षणात खंड पडणार नाही. विद्यार्थी स्मार्टफोन, लॅपटॉप, टॅबलेट या सारख्या उपकरणाचा उपयोग करुन शिक्षण घेवू शकतात. विद्यार्थ्यींच्या भवितव्याचा विचार करुन सरकारने 'दिशा' , पिजी पाठशाला या सारखे ॲप सुरु केले आहे. त्याचप्रमाणे दुरदर्शन, आकाशवाणी यामार्फत ही विद्यार्थ्यांपर्यंत ज्ञान पोहचेल अशी व्यवस्था केली आहे. आजच्या परिस्थितीत सर्वांनाच सामोरे जायचे आहे, घाबरुन चालणार नाही. त्यामुळे कोविड-19 मधल्या काळात विद्यार्थ्यांना ई-लर्निंग मुळे शिक्षण मिळेल ही एक नवसंजिवनी आहे असे म्हणता येते.

Key words: -

**प्रस्तावना:-**

बुध्दी, मन, भावना असणाÚया मानवाला घडविण्याचे कार्य शिक्षण करीत असते हे कार्य करतांना ज्या माध्यमातून शिक्षण द्यायचे आहे ते माध्यम जर उत्कृष्ठ असेल तर हाती घेतलेले कार्य अधिकच यशस्वी होत असते. औपचारिक शिक्षण शाळेत शिक्षक या माध्यमातून विद्यार्थ्यांना शिक्षण दिले जाते. प्राचिन काळापासून शिक्षण प्रचलित आहे. आज मानवाने 21 व्या शतकात पाऊल ठेवले आहे व आपल्या बुध्दीच्या जोराने अनेक नवनविन गोष्टीचा शोध लावला आहे. मानवाने तंत्रज्ञानात ही प्रचंड भरारी मारली आहे. या तंत्रज्ञानातूनच ई-लर्निग चा समावेश करण्यात आला. आज देशात कोविड-19 मुळे प्रचंड प्रमाणात सर्व क्षेत्रात संकट निर्माण झाले आहे. या संकटातून शैक्षणिक संस्था सुध्दा सुटल्या नाही. सगळीकडे भितीचे वातावरण सुरु असल्यामुळे शाळा सुरु करणे अशक्य आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचा आरोग्य व त्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही याचा विचार करुन ई-लर्निंग प्रणाली सुरु करण्याची आज आवश्यकता आहे.

**ई- लर्निंग म्हणजे काय:** ई-लर्निंग म्हणजे एक मिडीअम आहे, ज्यातून इंटरनेटच्या माध्यमातून शिक्षण घेतले जाते. वर्ग अध्यापनात माहिती तंत्रज्ञानाचा वापर करुन वापरण्यात येणारी आधूनिक शिक्षणपध्दती आहे. शिक्षणाच्या दर्जात सुधारणा घडवणारी व विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञानाच्या पलीकडे नवीन माहिती देणारी आनंदायी शिक्षणपध्दती आहे. ई- लर्निग साधनात संगणक, मोबाईल, दूरदर्शन, डिव्हिडी, एलसिडी, मॉनिटर यांचा वापर करुन शिक्षण घेता येते. ई-लर्निंग हे केवळ शिकविण्याची व माहिती प्रदान

करण्याची प्रक्रिया नसून विद्यार्थ्यांना ज्ञानात भर करुन त्यांचा विकास करण्याचे साधन आहे.

**कोविड 19 व ई-लर्निंग:-** कोविड 19 हे दुस-या महायुध्दानंतरचे जगासमोर सर्वात मोटे संकट आहे. मानवी जिवनाच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय सर्व बांजूवर या संकटाचे सावट आहे. या रोगावर प्रतिजैविक उपाय न मिळाल्यामुळे देशात सर्वत्र लॉकडाऊन जाहिर करण्यात आले आहे. लॉकडाऊन धोरण अवलंबून हा रोग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. या कोविड 19 मुळे सर्व जगभर भितीचे वातावरण पसरले आहे. देशातील सर्व व्यापार बंद झाले आहे. देशाची अर्थव्यवस्था ढासळली आहे, त्याचबरोबर शैक्षणिक परिस्थिती सुध्दा अधिक बिकट झाली आहे.

आज देशाची प्रगती फारच दयनीय आहे. परिस्थिती फारच बिकट स्वरुपाची झाली आहे. सगळीकडे भयाचे वातावरण आहे विद्यार्थी-पालकांच्या मनात भितीचे सावट निर्माण झाले आहे. अशातच शाळा सुरु केल्या व प्रचलीत शिक्षण देण्यास सुरवात केल्यास फार मोठे संकट उभे राहण्याची शक्यता आहे. लहान मुलांना, विद्यार्थ्यांना सामाजिक अंतर ठेवण्यास सांगणे कठिण आहे, तसेच विद्यार्थ्यांना पूर्ण वेळ मास्क लावणे हे सुध्दा हानीकारक आहे. शाळा सुरु झाल्यास कोरोनाचा प्रादूर्भाव प्रचंड प्रमाणात पसरण्याची भिती आहे. अशा वेळेस विद्यार्थ्यांच्या आरोग्याची जबाबदारी कोण घेणार? या सर्वांचा विचार करुन ई-लर्निंग पध्दती वापर करण्याचा विचार अंमलात आणण्यात आला आहे. ऑनलाईन शिक्षणामुळे विद्यार्थी हे शिक्षणापासून वंचित राहणार नाहीत. तसेच ऑनलाईन शिक्षणाने ज्ञान केवळ पाठयपुस्तकाचेच न देता विद्यार्थ्यांच्या सर्जनशिलतेला वाव मिळावा, तसेच विविध कौशल्याचे शिक्षण देण्याचा पाठपुरावा करण्यात येतो. त्यामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास घडवून येण्यास मदत होईल.

जगामध्ये विद्यार्थी आणि शिक्षक कोठेही असले तरी अध्ययन-अध्यापन करणे ऑनलाईन शिक्षणाने शक्य आहे. ऑनलाईन शिक्षणात विद्यार्थी आपल्याला पाहिजे त्या वेळेप्रमाणे शिक्षण घेवू शकतो. सरकारने पहिली ते बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी पाठयपुस्तकाचे ऑनलाईन पुस्तकाचा समावेश केला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना घरी बसवून पाहिजे ते पुस्तक इंटरनेट वरुन डाऊनलोड करुन अभ्यास करु शकतात. तसेच ‘स्वयं’ सारख्या ॲपने प्रत्येक शाखेतील विद्याथ्र्यांसाठी कोर्ससचे उपलब्ध करुन दिले आहे. प्रत्येक विद्याथ्र्यी या कोर्सचा उपयोग करुन आपले ज्ञान अद्यावत करु शकतो. संपूर्ण राज्यभर शिक्षण प्रक्रियेत एकवाक्यता आणि सुसूत्रता राहावी यासाठी शालेय विभागाने “दीक्षा” ॲप द्वारे अध्ययन - अध्यापनाची प्रक्रिया सुरु केली आहे. त्याचप्रमाणे भारत सरकारच्या “ई-पीजी पाठशाला” या मनुष्यबळ विकास मंत्रालयाने विकसित केलेल्या प्लॅटफॉर्मवर विविध पदवी, पदयुत्तर, अभ्यासक्रमाची विविध पुस्तके उपलब्ध करण्यात आली आहेत. “ नॅशनल डिजिटल लायब्ररी ऑफ इंडिया” या संस्थेने विद्याथ्र्यांना वेगवेगळया शैक्षणिक साहित्याची 80 हजाराहून अधिक ई-पुस्तके उपलब्ध करुन देण्यात आली आहे. तसेच दुरदर्शन वर अनेक शैक्षणिक कार्यक्रम प्रसार करण्यात येत आहे. तसेच ऑनलाईन क्लासेससाठी झूम, स्काईप, नेबेक्स असे विविध ॲपद्वारे विद्यार्थी व शिक्षक यांना कोविड -19 मध्ये अध्ययन - अध्यापन करणे सोयीस्कर होईल.

सध्याच्या काळात ऑनलाईन शिक्षणाचा उपयोग प्रचलित शिक्षणाला मिळालेली नवसंजीवनी आहे. शिक्षण ही अखंड चालणारी प्रक्रिया आहे, त्यामुळे कोविड-19 मुळे विद्याथ्र्यांच्या शिक्षणात खंड पडू नये, अध्ययन-अध्यापनाचे कार्य सुरळीत चालू राहण्यासाठी ऑनलाईन शिक्षण हे गरजेचे आहे. ऑनलाईन शिक्षण घेत असतांना यामध्ये अनेक फायदे सुध्दा लक्षात येतात.

**ई-लर्निंगचे फायदे:-**

1) ई-लर्निंग मुळे उच्च क्षमतेच्या विद्यार्थ्यांस आवश्यक असणारी आव्हाने आणि त्याच सोबत कमी क्षमतेच्या विद्यार्थ्यांस आवश्यक असणारा जास्त वेळ, दोन्ही एकाच वेळी देणे शक्य होते.

2) ई-लर्निंग मुळे शिक्षणाची गुणवत्ता वाढते व शिक्षण आनंदायी आणि सहज देखील होते.

3) ई-लर्निंग पध्दतीत शैक्षणिक साहित्य प्रकाशित केल्यानंतर, जगातील सर्व विद्यार्थी, शिक्षक हे त्यांचा वापर करु शकतात.

4) ई-लर्निंग मुळे विद्यार्थी घरातून किंवा इतर कोणत्याही ठिकाणाहून शिकू शकतो.

5) विद्यार्थ्यांच्या आवडीनिवडी किंवा पुर्वक्षमतेनुसार शिक्षण साहित्याच्या सादरीकरणात अनुरुप बदल

करण्याची क्षमता ई- लर्निंग पध्दतीत असते.

6) ई-लर्निंग मुळे सर्व विद्याथ्र्यांना समान ज्ञान प्राप्त करता येते.

7) ई-लर्निंग मुळे विद्याथ्र्याना दररोज अद्यावत ज्ञान मिळवता येते.

8) ई-लर्निंग मुळे विद्यार्थी स्वतःजवळ असणारे स्मार्टफोन, टॅब, लॅपटॉप वापरुन स्वतःच्या सोयीनुसार शिक्षण घेवू शकतात.

9) विद्याथ्र्यांना ई-लर्निंग मुळे स्वयं अध्ययन करण्याची सवय लागते.

10) ई-लर्निंग मुळे अध्ययन-अध्यापन प्रक्रिया सुलभ होते.

11) जगातील तज्ञाचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना सहज व कोठेही मिळेल.

12) जगात घडलेले बदल व नवीन ज्ञान विद्यार्थ्यांना सहज मिळेल.

13) शिक्षणात नवनवीन बदल होतील व शिक्षणात नवीन प्रवाह येतील.

14) विद्याथ्र्यांना तंत्रज्ञानाचे विविध साधने हाताळण्याची सवय लागेल.

15) शिक्षणात उपक्रमशिलता वाढेल.

16) विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धा निकोप होतील.

17) विद्यार्थ्यांचा शिक्षण घेण्यास आत्मविश्वास वाढेल.

18) विद्यार्थ्यांचा सर्वागिण व्यक्तिमत्व विकासाला चालना मिळेल.

ई- लर्निंगचे बरेच फायदे असले तरी काही प्रमाणात तोटे सुध्दा आहेत.

**ई- लर्निंगचे तोटे:-**

1) शिक्षण ही द्विमार्गी पध्दत आहे परंतु ई-लर्निंग मुळे शिक्षक व विद्यार्थी यांचा फारसा संबंध येत नाही.

2) ई-लर्निंग मध्ये विद्याथ्र्यांना एखाद्या मुदयावर लगेच प्रश्न विचारता येत नाही.

3) सतत स्क्रीन वर असल्यामुळे डोळयाचे, मेंदुचे आजार उद्भवू शकतात.

4) मुलांची एकाग्रता नसते. त्यामुळे ज्ञान मिळणे कठीण होते.

5) ई-लर्निंग तंत्रज्ञानावर अवलंबून आहे. त्यामुळे शिक्षण व्यवस्थेसाठी अनन्य आव्हाने निर्माण होऊ शकतात. जसे दुर्गम भाग आणि डोंगराळ भागात इंटरनेट उपलब्ध नसल्यास इंटरनेट कनेक्शनचा अभाव असल्यास तेथील विद्यार्थींचा शिकण्यासाठीचा वेग पुरेसा नसतो.

6) ई-शिक्षणाचा खर्च महाग असल्यामुळे तो साधारण विद्यार्थी, शिक्षक, शैक्षणिक संस्थाना परवडणारा नसतो.

7) ब-याच विद्यार्थी व शिक्षक यांना संगणक इंटरनेटचे चांगले ज्ञान अवगत नसल्यामुळे अध्ययन-अध्यापन सुलभ होत नाही.

8) विद्यार्थी अभ्यासा व्यतिरिक्त इंटरनेट वरील इतर गोष्टीकडे जास्त लक्ष देतात.

9) ई-लर्निंग मुळे मुद्दयांचे स्पष्टीकरण करतांना शिक्षक व विद्यार्थी यांचा चेहरा समोरा-समोर नसल्यास शिक्षणप्रक्रिया योग्य होण्यास अडथळा निर्माण होतो.

10) विद्यार्थ्यांमध्ये ज्ञान संपादन करण्याचे कौशल्य नसल्यास शिकण्याची प्रक्रिया योग्य होत नाही.

11) ग्रामिण भागातील विद्यार्थ्यांकडे संगणक, लॅपटॉप, टॅबलेट, स्मार्टफोन आणि इंटरनेट कनेक्शन सारख्या ई- शिक्षणासाठी लागणा-या उपकरणे नसल्यामुळे ग्रामिण भागातील विद्यार्थी शिक्षणापासुन वंचित राहतील.

12) वातावरणात बिघाड झाल्यास संप्रेषण प्रक्रिया योग्य न होता अध्ययन-अध्यापनात अडथळा निर्माण होते.

**निष्कर्ष:-**

प्राचिनकाळापासून शिक्षण प्रक्रिया चालू आहे. आज देशाची परिस्थिती कोविड - 19 मुळे फार बिकट झालेली आहे. त्यामुळे विद्याथ्र्यांच्या आरोग्याचा व त्यांच्या भवितव्याचा विचार करुन, तसेच त्यांच्या शिक्षणात खंड पडू नये म्हणून ई-लर्निग अध्यन-अध्यापनासाठी फायदेशिर ठरते. शिवाय ही काळाची गरज आहे. ई-लर्निगचे जसे फायदे आहेत तसे तोटे सुध्दा असल्यामुळे त्याकडे दुर्लक्ष करु शकत नाही.

**संदर्भग्रंथः-**

अहेर हिरा 2010, उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षण व शिक्षक - सुविचार प्रकाशन धंतोली, नागपूर

ए. एन. पाटील, एम. पी. जाधव, आर. डी. पाटील, 2015 उच्च शिक्षण प्रणालीची सद्यस्थिती - प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव